| MHOS080005252022 | नियमित दिवाणी दावा क्रं. २१५/२०२२<br>श्रीमंत ..वि.. जगदीश व इतर |
|---|---|

## निशाणी क्रमांक २२ वर आदेश पारीत

सदरचा अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी क्रं. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा हा निरंतर मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्रं. १ जगदीश शरणप्पा हावळे हा दिनांक २२/०३/२०१४ रोजी मयत झाला असुन मयतास १. सुकेशनी जगदीश हावळे–पत्नी, २. वेदांत जगदीश हावळे–मुलगा, ३. रुद्राक्षी जगदीश हावळे–मुलगी व रिया जगदीश हावळे–मुलगी हे वारस आहेत. त्यामुळे ते आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना अभिलेखावर घेण्याबाबत विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्रं. १ यांचे विद्वान विधीज्ञ यांनी अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दिले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादीतर्फे कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही व प्रकरण लांबविण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला असल्यामुळे नामंजुर करण्यात यावा. इतर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे न दिल्यामुळे सदरचा अर्ज विनाम्हणणे चालला.

४. युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर नमुद व्यक्ती हे मयताचे वारस आहेत असे दिसुन येते. सदर व्यक्ती हे मयत प्रतिवादी क्रं. १ चे वारस नसलेबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच वादीने

प्रस्तुत अर्जासोबत त्याचे शपथपत्र देऊन कथन केले की, सदर नमुद व्यक्ती हे मयताचे  वारस आहेत. करीता दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्रं. १ जगदीश शरणाप्पा हावळे यांच्या वारसांना अभिलेखावर घेणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीस निर्देशित करण्यात येते की, त्याने मयत प्रतिवादी क्रं. १ जगदीश शरणप्पा हावळे यांचे वारसांना प्रतिवादी क्रं. १–अ ते १–ड म्हणुन समाविष्ट करावे व तशी दुरुस्ती दाव्यात विहीत कालावधीत करुन दुरुस्त दावा अभिलेखावर दाखल करावा.

Shyam Shrinivas Kalaskar
Digitally signed by Shyam Shrinivas Kalaskar
Date: 2025.01.15 11:03:29 +0000

दिनांक १४/०१/२०२५

(एस.एस. कळसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लोहारा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : R.M. Kokare |
| Court Name | : Shri. S.S. Kalaskar, CJJD Lohara. |
| Date | : 14.01.2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 14.01.2025 |
| Judgment uploaded on | : 14.01.2025 |